**MHOS090020892025**

## निशाणी क्र. २२ वरील आदेश

**१.** प्रतिवादी क्र. २ यांनी प्रस्तुतचा अर्ज जवाबदावा स्वीकारण्याकरीता दाखल केला आहे.

**२.** अर्जामध्ये असे कथन आहे की, सदरील प्रकरणातील प्रतिवादी क्र. २ हे आजारी असल्यामुळे जबाबदावा दाखल करू शकले नाहीत. झालेला विलंब माफ होवून जबाबदावा स्विकारण्यात यावा अशी विनंती केली आहे. अर्जाच्या पृष्ठयर्थ निशाणी क्र. २३ अन्वये प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

**३.** प्रस्तुत अर्जावर वादीने प्रतिवादी क्र. २ यास दि. २३.०३. २०२६ रोजी बजावणी समन्सची झालेली आहे. मुदतीत कैफीयत दाखल केली नाही. तसेच कोणत्या आजाराने आजारी होता हे स्पष्ट नमुद केले नाही. अर्ज व शपथपत्र खोटे आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**४.** दोन्ही बाजूंना ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले.

**५.** प्रस्तुतचा दावा हा अडथळा करू नये असा निरंतर मनाई बाबतचा आहे. दाव्याची सदयस्थिती ही उर्वरीत प्रतिवादींच्या उपस्थितीकरीता आहे. दि. २३.०३.२०२६ रोजी समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र. २ हे दि. ०९.०६.२०२६ रोजी त्यांच्या वकीलांमार्फत हजर झालेले आहेत, परंतु जबाबदावा हा मुदतीत दिलेला नाही.

**६.** सबब, अर्जामध्ये दिलेले कारण गृहीत धरता प्रस्तुतचा अर्ज मंजुर केला जावू शकतो. दाव्याचे कामकाज गुणदोषांवर चालवून दावा निकाली काढण्यासाठी व भविष्यातील सदरील पक्षकारांचे न्यायालयीन कामकाजाचे प्रमाण टाळण्याकरीता प्रतिवादींतर्फे कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. कैफियत अभिलेखावर घेतल्याने वादींचे अपरिमित नुकसान होईल, असे वाटत नाही. याउलट, अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्यासाठी संधी मिळणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून उभयपक्षकारांना आपापली बाजू सिध्द करण्याची संधी देणे आवश्यक आहे. परंतु, अर्ज मंजुर करताना वादींचे झालेले आर्थिक व वेळेचे नुकसान दुर्लक्षित करून चालणार नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीकोनातून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीला प्रतिवादी क्र.२ यांनी रक्कम रूपये २००/— इतका खर्च वादीला पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीला खर्चाची रक्कम प्राप्त झाल्यास प्रतिवादी क्र. २ यांचा जबाबदावा अभिलेखावर घेण्यात यावा.

स्वाक्षरीत/—

दिनांक ३०/०६/२०२६
ठिकाण : कळंब.

(श्रीमती ए.डी. जाधव)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, कळंब.